# संत जनाबाईच्या साहित्यातून स्त्री सक्षमीकरण प्रतिबिंब-एक अभ्यास

**श्रीमती दर्शना सुभाष डोकरमारे** बी.एड. एम.एड. (एकात्मिक) शिक्षणशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**डॉ.श्रीमती रूपाली उत्तम संकपाळ** सहयोगी प्राध्यापिका शिक्षणशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

---

**सारांश**

भारतीय धर्म व्यवस्था पुरुषी मानसिकतेला उत्तेजन देणारी आहे .(बंडगर ज्ञा.२०२४ होय होय वारकरी) पुरुषप्रधान समाज व्यवस्थेत स्त्रियांचे वाजवी मानवी हक्कही नाकारले गेले. कायदे, न्यायंत्रणा, राजकारण, सामाजिक रूढी आणि अर्थकारण अशा सर्व क्षेत्रात धर्माचा कमी-अधिक पगडा होता. या समाजव्यवस्थेत, कोणताच अधिकार स्त्रियांना नव्हता. वेदाचा,धर्मग्रंथांचा,उपदेश करण्याचा, धर्मपिठांचे पिढांधिपती तसेच मंदिरात प्रवेश नाकारला जात होता. आगोदर कामधंदा सोडून भक्ती करावी असे सांगितले जात होते. वारकरी संतांनी कर्म हिच भक्ती आहे असा विचार रूजविला. जनाबाई म्हणतात मी कामधंदा सोडून नव्हे तर दळताना, कांडताना भगवंताला आळवते.

वारकरी संत परंपरेत मात्र महिलांना पुरुषाच्या बरोबरीचे सन्मान आणि हक्क मिळालेला आहे. स्त्री संतांचा अभ्यास करण्याआधी संत स्त्री यांची कौटुंबिक पार्श्वभूमी समजून घ्यायला हवी. जनाबाई, मुक्ताबाई-अविवाहित सोयराबाई, निर्मळाबाई, बहिणाबाई-विवाहित, मीराबाई विधवा, कान्होपात्रा-वेश्या कुटुंबातून होत्या. तेराव्या शतकामध्ये स्त्रियांना स्वेच्छेने अविवाहित राहणं हे निंदनिय समजलं जात होतं. धर्मशास्त्राचे तसे अनेक नियम होते. (साळुंखे आ.ह. यांनी त्यांच्या "हिंदू संस्कृती आणि स्त्री") या पुस्तकात माहिती दिली आहे. वारकरी संप्रदाय हा संसारिकांचा संप्रदाय आहे. त्यामुळे कोणताही संन्यासी नाही. परंतु जनाबाई अविवाहित राहण्यामागचं कारण त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी आई-वडिलांनी पंढरपुरात सोडल्यानंतर त्या नामदेवाच्या घरी राहिल्या. जन्म, कुळाचा आणि जातीचा ठाव ठिकाणा नसल्याने त्यांचा विवाह होणे कठीण झाले असावे, तसेच मुक्ताबाई ज्ञानदेवा च्या धाकट्या भगिनी संन्याशाचे मूल अशा जाती बहिष्कृत मुलीचा विवाह होणे शक्य नव्हतं. स्त्रियांना खोटारड्या, मायावी, परपुरुषाविषयी आकर्षण, स्वार्थी, पुरुषांच्या परमार्थ मार्गात अडथळा आणणारी प्रमुख बाब समजत होते.

(बंडगर ज्ञा.२०२४ होय होय वारकरी)

स्त्रिया तुम्ही पूर्व जन्माचा पाप अशी धारणा स्त्रियांच्या मनात निर्माण केली गेलेली होती. यातून स्त्रियांच्या मनात न्यूनगंडाची भावना निर्माण झाली होती. त्यांना यातून बाहेर काढण्याचे काम वारकरी संतातील संत स्त्रियांनी विशेषता: जनाबाईच्या मनात स्त्री जन्म म्हणून कोणताही न्यूनगंड नव्हता. तो त्यांनी त्यांच्या अभंगातून दिसून येतो. त्या मार्गांनी त्यांनी इतर स्त्रियांना बाहेर काढले.

स्त्री जन्म म्हणूनही न व्हावे उदास

साधुसंत ऐसे केले मज

याबाबत सद्य शोध निबंधामध्ये चर्चा करण्यात आली आहे.

संत जनाबाईच्या साहित्यातून स्त्री सक्षमीकरण प्रतिबिंब-एक अभ्यास

**प्रास्ताविक**

वात्सल्य, सहनशीलता, त्यागी वृत्ती, समर्पक वृत्ती, स्त्री विषयीच्या भावना संत जनाबाईच्या काव्यातून प्रकर्षाने दिसून येतात. असे ज्येष्ठ अभ्यासक (बंडगर ज्ञा.(२०२४) होय होय वारकरी मध्ये ढेरे रा.ची.यांना उल्लेख केल्या नुसार)

स्वतःचं घर नाही, माहेर तर आधीच गेले. मान-सन्मान प्रतिष्ठाही नाही. दामाजीच्या कुटुंबात लहानाची मोठी होते. एक अनाथ दासी म्हणून ती अनेक अनुभव घेत जीवन जगते. नामदेवाच्या घरी चौदा माणसांचे कुटुंब. जनाबाई या सर्वांचं काम करीत असत. नामदेवाच्या कुटुंबाचा परिचय करून देताना संत जनाबाई म्हणतात.

नामदेवाच्या घरी चौदा जणे स्मरता हरी

चौघे पुत्र ,चौघी सुना नित्य स्मरती नारायणा

आणि माय बाप पाही नामदेव राजाबाई

आऊबाई लेकी निंबाबाई बहिणी

पंधरावी ती दासी जनी.

नाम्याची दासी म्हणून परिचित असलेल्या संत जनाबाई ही मूळ परभणी जिल्ह्यातील गंगाखेड ची रमा व कुरुंद या विठ्ठल भक्त दांपत्याची मुलगी. अवघ्या वयाच्या सातव्या वर्षापासूनच तिच्या वाट्याला दास्यत्व आले होते. अक्षर ओळख

नसतानाही संत जनाबाईने जे अभंग रचलेले स्त्रीवादी विचारांना सहज स्पर्श केले आहेत. कुठेतरी तिच्या मनात बंडखोरी दडलेली आहे. स्त्रीत्वाची मर्यादा बंधणे झुगारून सामाजिक मान-मान्यतेला आव्हान देते.

जनाबाईला वारकरी संप्रदायात संत वाटिकेतील जाईची वेल असे संबोधले जाते. संत जनाबाईच्या नावावर असलेले एकूण सुमारे साडेतीनशे अभंग संत गाथेत मुद्रित केले आहेत. कृष्णजन्म, थाळीपाक, प्रल्हादचरित्र, बालक्रीडा अशा रचना जनाबाईच्या नावावर आहेत. कविता जशी भगवंताच्या प्रेमाने ओतपोत भरलेली आहे. तशीच सामाजिक प्रश्नावरही त्या भाष्य करणारी आहेत. संत नामदेव महाराज जेव्हा भागवत धर्माचा विचार भारतभर पोहोचवण्यासाठी पंजाब मध्ये गेले, तेव्हा जनाबाईंनी वारकरी संप्रदायाचे नेतृत्व केले. एखादी स्त्री सार्वजनिक जीवनात वावरू, नेतृत्व करू लागते तेव्हा पुरुषप्रधान व्यवस्थेला ते मानवणारे नसते. स्त्रीच्या कर्तृत्वावर शंका घेता येत नाही तेव्हा, तिच्या राहणीमानावर बोट ठेवले जाते. तुझा पदर डोक्यावर राहत नाही तुला वारकरी संप्रदायाचे नेतृत्व करण्याचा अधिकार नाही या शब्दात सुनावले जाते. तेव्हा त्याला प्रतिक्रिया देताना संत जनाबाई म्हणतात.

' डोईचा पदर आला खांद्यावरी ।
भरल्या बाजारी जाईन मी ॥
हाती घेऊन टाळ खांद्यावरी वीणा ।
आता मज मना कोण करी ।'

पदराच्या गोष्टी काय करताय ? मी पदर खुशाल खांद्यावर टाकून भरल्या बाजारातून जाईल भजन आणि कीर्तन करण्यास मनाई करण्यात येते तेव्हा या भाषेत त्या थेट बंडच पुकारतात. या अभंगातून संसारातून मनाने मुक्त व बंडखोर झालेली जनाबाई दिसते. तर जनाबाई समाजव्यवस्थे विरुद्ध बंडखोरीची भूमिका घेतात. पारंपरिक समाज व्यवस्थेने स्त्रियांच्या संदर्भाने घालून दिलेले नियम जनाबाई तोडण्याची तयारी दर्शवितात. स्त्रियांच्या अन्याय अत्याचाराच्या विरोधातही लेखन केले. स्वतःचे कर्तुत्व करताना समाजाची नियमव्यवस्था झुगारून त्यांनी दिली. प्रसंगी समाज व्यवस्थेच्या विरोधात बंडाची भूमिका ही घेतली. डोईचा पदर खांद्यावर येणे ही तत्कालीन समाजामध्ये, स्त्रियांच्या दृष्टीने चांगले लक्षण मानले जात नसे. असे कृत्य सभ्यतेच्या मर्यादा ओलांडणारे असायचे. असे असतानाही आपले उद्दिष्ट्य साध्य करण्यासाठी जनाबाई मात्र पारंपरिक नियम मोडण्याची तयारी दर्शवितात. श्री विठ्ठलाचे नामस्मरण, भक्ती करण्याकरीता आपला पदर खांद्यावर जरी आला तरी त्यांना त्याची पर्वा वाटत नाही, एवढेच नव्हे तर श्रीविठ्ठलाचे नामस्मरण करण्याकरीता त्या भरल्या बाजारातही जाण्याची तयारी ठेवतात. तत्कालीन काळात स्त्रीने भरल्या बाजारात जाणे याकडेही समाज वाईट नजरेने पाहत असे. घरदांज स्त्री असे कधीही करीत नसे. जनाबाई मात्र बाजारात जाण्याचीही तयारी ठेवतात. यातूनच प्रचलित नियमांविरुध्द कठोर भूमिका घेण्याची तयारी दर्शवितात. एवढेच नव्हे तर विठ्ठलाच्या भक्तीसाठी हातात टाळ व खांदयावर वीणा घेण्याचीही तयारी दर्शवितात. असे कृत्य करण्यास आपणास कोणीही आड येऊ शकत नाही. असे त्या स्पष्टपणे भूमिका घेताना दिसतात. संत जनाबाईची बंडखोरीची भाषा एवढ्यापुरतीच थांबत नाही तर

' पंढरीच्या पेठे मांडियले पाल ।
मनगटावर तेल घाला तुम्ही॥
जनी म्हणे देवा मी झाले वेसवा ।
रिधाले केशवा घर तुझे ॥'

असे म्हणत त्या यापुढचेही पाऊल टाकतात. कोणीही आपली कितीही निंदा केली तरी, त्यांना मात्र त्याची काही ही पर्वा वाटत नाही. श्रीविठ्ठलासाठी पंढरीच्या पेठेत पाल मांडण्याची त्या तयारी ठेवतात. 'पाल मांडणे', 'घर निघणे' यासारखे शब्द तत्कालीन समाजव्यवस्थेत स्त्रियांकरीता दूषण म्हणून वापरले जाते. परंतु जनाबाईना मात्र त्याची पर्वा वाटत नाही. व्यवस्था नाकारून स्त्रीत्वाची मर्यादा व बंधने झुगारून सामाजिक मान्यतेला आव्हाने देत इतक्या स्पष्टपणे प्रतिष्ठेला हादरा देणारी भाषा बाराव्या शतकात एक स्त्री दासी करते. स्त्री संत श्रेष्ठ जनाबाई क्षेत्र पंढरपुर येथे महाद्वारी आषाढ कृष्ण त्रयोदशी शके १२७२ म्हणजेच इ.स. १३५० ला समाधीस्थ झाल्या.

अश्या या जनाबाईंनी त्या काळच्या सामाजिक परिस्थिती मध्ये आपल्या अभंगातून तेराव्या शतकामध्ये असणाऱ्या स्त्री विरोधी समाज परिस्थितीबाबत बंड पुकारले आहे आणि याचा अभ्यास हा सद्य संशोधकांनी पुढील उद्दिष्टांना अनुसरून केला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टे**

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत

(१) संत जनाबाई यांच्या स्त्रीवादी भूमिका अभ्यासणे.
(२) संत जनाबाई यांच्या अभंगातून पुरुषप्रधान मानसिकतेचे आणि सामाजिक बंधनांचे विश्लेषण करणे
(३) स्त्रीवादी परंपरेतील संत कवयित्रींच्या अभंगाचे स्त्री सशक्तिकरण प्रतिबिंबाचे स्वरूप अभ्यासणे.
सद्य अभ्यासाचे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी पुढीलप्रमाणे गुणात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.
संशोधन प्रक्रिया

**अभ्यासाचा नमुना**

सध्याच्या अभ्यासासाठी संत जनाबाई यांच्या एका अभंगाची सहेतुक निवड करण्यात आली आहे. अभंगाचे नाव- डोईचा पदर आला खांद्यावरी .

**संशोधन पद्धत**

प्रस्तुत संशोधन हे वर्तमान स्थिती मध्ये कश्या प्रकारे तेराव्या शतकातील संत जनाबाईंचे अभंग आता देखील परिस्थितीचे शाब्दिक वर्णन करण्यात याशी निगडित आहे. म्हणून प्रस्तुत संशोधना साठी गुणात्मक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे.

**माहितीचे संकलन**

माहितीचे संकलन संत जनाबाई यांच्या अभंगातून डोईचा पदराला खांद्यावरी या अभंगातून स्त्री सक्षमीकरण प्रतिबिंब अभ्यास करण्यासाठी माहिती संकलनाचे प्राथमिक आणि दुय्यम स्त्रोत वापरण्यात आले. संत जनाबाईने लिहिलेले अभंग आणि त्यावर लिहिलेले शोध प्रबंध याद्वारे माहिती संकलित केली आहे. संशोधनासाठी प्राथमिक स्त्रोतांचा अभ्यास करण्यासाठी संत जनाबाईच्या अभंगाचा संशोधकांनी स्वतःवाचन केले. दुय्यम स्त्रोतांमध्ये वेगवेगळे लेख, नियतकालिके यांचा वापर केला आहे आणि त्यांचा गुणात्मक संशोधन पद्धतीने वापर विश्लेषण केलेले आहे.
अश्या प्रकारे संशोधन पद्धती वापरण्यात आली तर उद्दिष्टानुसार कार्यवाही पुढील प्रमाणे.
अभ्यासाची उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी दुय्यम स्त्रोताच्या सहाय्याने माहिती संग्रहित करण्यात आली आहे आणि त्याचे गुणात्मक विश्लेषण पुढीलप्रमाणे केले आहे.

| अभ्यासाची उद्दिष्टे | अभंगाची ओळ | अभंगाचा अर्थ | स्त्री सक्षमीकरण विषयीचे प्रतीबिंब |
|---|---|---|---|
| पहिले उद्दिष्टे जनाबाई च्या स्त्रीवादी भूमिका अभ्यासणे. | डोईचा पदर आला खांद्यावरी। भरल्या बाजारी जाईन मी ॥ | भजन आणि कीर्तन करण्यास मनाई करण्यात येते तेव्हा ते थेट बंडच पुकारतात.भक्ती करण्याकरीता आपला पदर खांद्यावर जरी आला तरी त्यांना त्याची पर्वा वाटत नाही. | स्त्रियांचे स्वावलंबन,अनेक स्त्रियांना सक्षमीकरणासाठी आव्हान, स्त्रियांच्या निर्णय क्षमतेवर बंधने, मानसिक,भावनिक आणि शारीरिक स्वातंत्र्य नसणे यास विरोध संत जनाबाई आपल्या अभंगातून करतात. |
| दुसरे उद्दिष्टे जनाबाई यांच्या अभंगातून पुरुषप्रधान मानसिकतेचे आणि सामाजिक बंधनांचे विश्लेषण | हाती घेऊन टाळ खांद्यावरी वीणा ॥ आता मज मना कोण करी। | संसारातुन मनाने मुक्त व बंडखोर झालेली जनाबाई दिसते. समाज व्यवस्थे विरुद्ध बंडखोरीची भूमिका घेतात. पारंपरिक समाज व्यवस्थेने स्त्रियांच्या संदर्भाने घालून दिलेले नियम जनाबाई तोडण्याची तयारी दर्शवितात. स्वतःचे कर्तुत्व सिद्ध करताना समाजाची नियमव्यवस्था झुगारून त्यांनी दिली. | सामाजिक बंड ,स्त्रियांच्या निर्णय क्षमतेवर बंधने, समाजाने घालून दिलेल्या स्त्रियांसाठीची चौकट, स्त्रियांचे स्वावलंबन, अनेक स्त्रियांना सक्षमीकरणासाठी चे आव्हान स्त्री सक्षमीकरणाचा विचार, मानसिक, भावनिक आणि शारीरिक स्वातंत्र्य.याबद्दलचे ठाम मत संत जनाबाई व्यक्त करताना अभंगातून दिसतात. |
| पहिले उद्दिष्टे जनाबाई च्या स्त्रीवादी भूमिका अभ्यासणे. | पंढरीच्या पेठे मांडियले पाल। मनगटावर तेल घाला तुम्ही॥ | तत्कालीन समाजव्यवस्थेत स्त्रियांकरीता दूषण म्हणून वापरले जाणारे बोल जनाबाई बोलते. व्यवस्था नाकारून स्त्रीत्वाची मर्यादा व बंधने झुगारून सामाजिक मान्यतेला आव्हाने देते. | सामाजिक बंड ,स्वतःची ओळख, स्वअस्तित्व,परंपरावाद,<br>पुरुषप्रधान मानसिक मुळे स्त्रियांच्या विचाराची होणारी कुचंबना,<br>सामाजिक भेद, सामाजिक बंधने, स्त्रियांच्या निर्णय क्षमतेवर बंधने याबाबत ठामपणे मत मांडताना संत जनाबाई दिसतात. |
| तिसरे उद्दिष्ट स्त्रीवादी परंपरेतील संत कवयित्रींच्या अभंगाचे स्त्री सशक्तिकरण | जनी म्हणे देवा मी झाले वेसवा । | 'पाल मांडणे', 'घर निघणे' यासारखे शब्द तत्कालीन समाजव्यवस्थेत स्त्रियांकरीता दूषण म्हणून वापरले जाते. प्रतिष्ठेला हादरा देणारी भाषा बाराव्या शतकात एक स्त्री दासी | सामाजिक बंड, पितृसत्ता व्यवस्थेच्या विरोधी संघर्ष, पुरुषप्रधान मानसिक ते मधून दिसून येणारी स्त्रियांची विचाराची होणारी कुचंबना, समाजाकडून मानसिक शोषण ,परंपरावाद याबाबत उपहार करताना संत |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रतिबिंबाचे स्वरूप अभ्यासणे. | रिधाले केशवा घर तुझे ॥ | करते. | जनाबाई दिसतात. |

**निष्कर्ष व चर्चा**

बंडखोर भाषेत पुरुषांना आव्हान देताना म्हणते मी वेसवा झाली. स्पष्टपणे प्रतिष्ठेला हादरा देणारी भाषा तेराव्या शतकात एक स्त्री तिही दासी करते. वेळप्रसंगी प्रत्यक्ष परमेश्वरालाही ती आपल्या बरोबर कामाला जूंपते यातून संत जनाबाईला स्त्री पुरुष समानतेचा धागा गुंफायचा आहे. स्त्री-पुरुष भेद तिला मान्य नाही. संत पदाला पोहोचण्यासाठी जनाबाईला संघर्ष करीत मोठा लढा द्यावा लागला. संत नामदेवाचे बोट धरून ती आध्यात्मिक व साहित्यिक प्रवासात आली असली तरी आपल्या साहित्यिक प्रवासात मात्र स्वतःची ओळख आणि स्वतंत्र वाट शोधली. लेखन क्षेत्रात तिने आपला स्वातंत्र्य लौकिक निर्माण केला. जनाबाई नामदेवा विषयी कृतज्ञ असली तरी ती कृतज्ञतेच्या ओझ्याखाली वाकलेली नाही. या उपकाराचे आत्मभान ठेवत पुढे संतत्व प्राप्तीच्या दिशेने चालत राहिली आहे. आज संपूर्ण देश स्त्री सक्षमीकरण, स्त्री-पुरुष समानता, महिला सबलीकरण सारख्या विचारांना समाजात रुजवताना दिसून येते. परंतु संत जनाबाईने त्यांच्या अभंगातून या सर्व बाबींचा उल्लेख १३ व्या शतकात करून दिला आहे. आज २१ व्या शतकात सुद्धा त्यांनी सांगितलेले विचार त्यांचे स्त्रीवादी मत अंगीकारण्यासारखे आहे. तसेच त्यांच्या या विचारांची खरी गरज आज आपल्याला आहे आणि अश्या साहित्याच्या अभ्यासक्रमामध्ये व पर्यायाने पाठ्यपुस्तकातून समावेश करण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भसूची**

१) पेकम सो. सु. (२०२१). संत जनाबाईचे तत्त्वज्ञान एक चिकित्सक अभ्यास
२) बसवंते मा. (२०१६). संत जनाबाईचे अभंग गाथा एक विश्लेषण ISRJ
३) लांडे वि. ना. (२०२१).संत जनाबाई यांचे अभंग आणि महिला सक्षमीकरण VOLUME- XISSUE-I-JANUARY
४) भालेराव जी. पी., थारवाडकर ए.एस (२०१८). स्त्री साहित्यिका अग्रणी : संत मुक्ताबाई ,संत जनाबाई ,संत कान्होपात्रा VOLUME -VIL,ISSUE
५) गायकवाड मी. द. (२०२१). मध्ययुगीन संत साहित्यातील स्त्री जीवन संत जनाबाई स्त्रीवादी भूमिका IRJHIS
६) बंडगर ज्ञा.(२०२४). होय होय वारकरी राजगृह प्रकाशन कोल्हापूर